# घोषणा

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग

### पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा – २०१७ मधील शारीरिक चाचणीसाठी वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ देण्याची विनंती केलेल्या उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम

पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा – २०१७ मधील शारीरिक चाचणीसाठी वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ देण्याची विनंती केलेल्या उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम **दि. २६ डिसेंबर, २०१८ ते २९ डिसेंबर, २०१८** या कालावधीत मुंबई येथील **पोलीस प्रशिक्षण केंद्र, पोलीस कॅम्प, मरोळ, मरोळ-मरोशी रोड, अंधेरी (पुर्व), मुंबई** येथे घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. याबाबतचा सविस्तर कार्यक्रम आयोगाच्या वेबसाईटवर नवीन माहिती या सदरात प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार उमेदवारांनी शारीरिक चाचणीकरीता नमूद केलेल्या मैदानावर, विहित दिनांकास वेळेवर उपस्थित रहावे. याबाबतचे शारीरिक चाचणीचे पत्र उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेसाठी नोंदणीकृत केलेल्या ई-मेलद्वारे कळविण्यात येईल. तसेच त्यांना शारीरिक चाचणीचा दिनांक SMS द्वारे ही कळविण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

२. वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढीच्या शारीरिक कार्यक्रमास उपस्थित राहणा-या उमेदवारांनी शारीरिक दृष्टया तंदुरुस्त असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र (Medical Fitness Certificate) त्याचदिवशी सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा त्यांची शारीरिक चाचणी घेतली जाणार नाही. **तसेच प्रस्तुत परीक्षेच्या वैद्यकीय मुदतवाढीच्या शारीरिक चाचणीचा सदर कार्यक्रम अंतिम असून प्रस्तुत प्रकरणी यानंतर शारीरिक चाचणीकरिता वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ मिळण्याबाबतची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही. याची देखील संबंधित उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.**

ठिकाण - मुंबई
दिनांक - १० डिसेंबर, २०१८

उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई